# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २७/०३/२०२२ (रविवार)

---

## घरफोडी

पोलीस स्टेशन मौदा – अंतर्गत वार्ड नंबर १ मारोडी पुर्व ०५ किमी, दिनांक २६/०३/०२२ चे वा १४.०० ते. २६.०३.२२ चे १४.१५ दरम्यान, कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे आजुबाजुला असलेल्या दोन्ही घराचे **मागील व समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून दिवानात व आलमारीत ठेवलेले नगदी १,५५,०००/– रू व २९ ग्रॅम सोने अंदाजे कि. ७२,५००/– रू असा एकुण २,२७,५००/– रू चा माल चोरून नेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामराव आंनदराव मस्के वय ४२ वर्ष, रा वार्ड नंबर १ मारोडी नागपुर यांचे रिपोर्टवरून पोस्टे मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक /चौधरी पोलीस स्टेशन मौदा ७०३८८२२२०५ हे करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

पोलीस स्टेशन खापरखेडा :– अंतर्गत वार्ड क्र. ३ ॲम्बेन्सी हॉटेल समोर, दिनांक २६.०३.२२ चे १४.०० वा यातील मृतक हा कबाळीचे सामान खरेदी करण्याकरीता गेला असता त्याने आपला ठेला टॅम्बेन्सी हॉटेल समोर उभा करून रस्ता ओंलाडत असता **यातील ट्रक क्र एम एच ४० सी डी १८४३ चा चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन मृतकाला धडक मारून चाकामध्ये दबुन जागीच मरण पावण्यास कारणीभुत झाला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे कुणाल हरीष पिल्लेवान वय ३२ रा पिवळी नदी जवळ नागपुर यांचे रिपोर्टवरून पो स्टे खापरखेडा येथे ट्रक चालकाविरूध्द कलम २७९.३०४(अ) भादवि सह कलम १८४ मोटर वाहन कायदा अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निमगडे पो स्टे खापरखेडा मोनं–८९९९९१७११२ करीत आहेत.

## दुखापत

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :– अंतर्गत इंडोरामा गेट क्र १ बिकानेर हॉटेल ३ किमी पुर्व. दिनांक २६/०३/२२ चे १२.०० ते १२.३० वा दर. यातील फिर्यादी व आरोपी यांचा इंडोरामा कंपनी गेट नं १ समोरील बिकानेर हॉटेलवर नास्ता करीत असतांना, **शाब्दिक वाद झाल्याने आरोपीने लाकडी आडजात दांड्याने फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रितेश जयपाल कौरती वय २३ वर्ष रा. रूईखैरी नागपूर यांचे रिपोर्टवरून आरोपी नामे– रामा देउळकर रा रूईखैरी नागपूर यांचेविरूध्द पो स्टे एमआयडिसी बोरी येथे कलम ३२४ भादवि चा गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ/ तरमले पोस्टे एमआयडीसी बोरी मो नं. ९९२३६९९१८५ करीत आहेत.

## मोटर सायकल अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन बोरी :–** अंतर्गत टोलनाका जवळ बोरखेडी १० किमी दक्षिण. दिनांक २६.०३.२०२२ चे १९.०० ते २०.२३ वा दर. यातील फिर्यादी हा टोलनाका बोरखेडी येथे पोहचुन त्याची गाडी टोल नाक्यावर थांबवून त्याचा गाडी चालक जरशद खान हा गाडीचे खाली उतरून हरीयाना धाब्यावर पाणी पिण्यासाठी रोड क्रॉस करून जात असता, **बुटटीबोरी कडून युनिकॉन गाडी क्र एम.एच.४०–सि.बी.–०९०४ चे चालकाने त्याची ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून जखमी नामे –जरशद खान याला धडक मारल्याने त्यास गंभीर दुखापत झाली.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कासीमखान फजरखान खान वय ३५ वर्ष, रा पिलसु त.पहाडी जि. भरतपुर रा. राज्यस्थान यांचे रिपोर्टवरून आरोपी नामे– प्रणय मारोती रामसोले रा. चिकलधोकडा त.उमरेड जि. नागपूर यांचेविरूध्द पो स्टे बोरी येथे कलम २७९,३३८, भादवि १८४ मोटर वाहन कायदा अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ धवराळ पो.स्टे बोरी मो क्र ९७६५४९७००५ करीत आहेत.

## अति प्रमाणात दारू प्राशन केल्याने मृत्यु

**पोलीस स्टेशन भिवापूर :–** अंतर्गत घटनास्थळ मौजा भोगाव सोमनाळा पुर्नवसन ८ किमी उत्तर, यातील मृतक आषिश नत्थुजी मगर वय २७ वर्ष रा मरूपार पुर्णवसन ता. भिवापूर हा आपल्या परिवारासह लग्नाचे कार्यक्रमाला मौजा भोगाव सोमनाळा पुर्नवसन येथे गेला होता, रात्री ०९.०० वा दरम्यान मृतक याने जेवन–खावन केले. **व दारू जास्त प्रमाणात पेऊन झोपला होता. दिनांक २६/०३/२०२२ चे ०७/०० वा सकाळी उठविले असता उठला नसल्याने मृतकला ग्रामिण रूणालय भिवापुर येथे नेले असता, तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.**

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे सफौ/ आलम पोस्टे भिवापूर याचे रिपोर्टवरून पो स्टे भिवापुर येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास सफौ/प्रकाश आलम पोस्टे भिवापूर मो क्र ९७६७५४५४३८ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**